जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ४९ वे ❖ अंक ९ वा ❖ मे २०१८ ❖ वीर संवत २५४४ ❖ विक्रम संवत २०७४

या अंकात


| | पान नं. | | पान नं. |
|---|---|---|---|
| • ।। जिनेश्वरी ।। अध्याय २५ - यज्ञिय | १५ | • बीजेएस - वॉटर कप स्पर्धा | ७३ |
| • जीवन बोध क्षणिकाएँ | १९ | • आनंदऋषिजी हॉस्पिटल - नेत्र रुग्णसेवेचे लोकार्पण | ७५ |
| • नकारना भी सीखें | २० | • आनंदऋषिजी हॉस्पिटल - शिबीर | ७७ |
| • क्षमाशील बने नर नारी | २५ | • अरिहंत सोशल ग्रुप, पुणे | ७७ |
| • माझ्या दृष्टीकोनातून जैन धर्म व जैन समाज | २९ | • जय आनंद महावीर युवक मंडळ, अहमदनगर | ७९ |
| • कव्हर तपशील | ३२ | • जय आनंद पदयात्रा | ७९ |
| • बिमारी की जड - पकड | ३९ | • रांका ज्वेलर्स, पुणे | ८१ |
| • पुरुषाकार पराक्रम ध्यान साधना | ४० | • वीतराग सेवा संघ, पुणे | ८१ |
| • ब्रह्मचारी विभूषारहित सेहत्ता | ४३ | • गुरु आनंद तीर्थ, चिचोंडी - वर्षीतप पारणे | ८३ |
| • आत्मविश्वास की आत्मघात | ४४ | • गौतमनिधी संकलन, शांतीनगर, पुणे | ८४ |
| • रत्नसंदेश | ४५ | • अरिहंत जागृती मंच, पुणे | ८५ |
| • भगवान महावीर जन्मकल्याणक सर्वत्र उत्साहात साजरा | ४७ | • धर्माच्या कॉलममध्ये जैन लिहा | ८५ |
| • हास्य जागृति | ५७ | • श्री. भिकमचंदजी कटारिया, पुणे | ९१ |
| • ईच्छापत्र (Will) काळाची गरज | ६७ | • मृत्यु कसौटी है | ९२ |
| • आई कल्पवृक्षाची सावली | ७१ | • जैन सोशल ग्रुप, पुणे परिवार | ९५ |

● श्री अशोकमुनीजी म.सा. ७६ वाँ मासखमण ९७
● ऐसा बेटा होता है ९८
● जीतो, पुणे – जीतो नगर व पुरस्कार ९९
● गौतम लब्धी फाउंडेशन, पुणे १००
● नेपाळ मधील जैन समाज १०१
● डॉ. विमल बाफना – जैन अध्यासन निवड १०२
● जैन कॉन्फ्रेस् युवा शाखा – माता–पिता पुरस्कार, पुणे १०३
● श्री. श्वेतांबर युवक महासंघ, पुणे १०४
● श्री. अविनाशजी चोरडिया – पुरस्कार १०५
● जैन दीक्षा, पुणे १०६
● जीतो छात्रावास, कोटा १०७
● चारोळ्या १११
● पास नापासाचे शिक्केच नकोच ११२
● सौ. अलकाबेन गुजर, पुणे – दीक्षा ११३
● विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

● वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA — Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146 — IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**
**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९११९४०९
❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
❖ **सुखसागर नगर, कात्रज –** श्री. प्रफुल्लजी विजयकुमार मुनोत, मो. ९७३००४५७१८
❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२११३००५५९
❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
❖ **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
❖ **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२६९५४३३
❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

**तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत**

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.**

**भावानुवाद : साध्वी श्री ओजसदर्शनाजी म.सा., सौ. योगिता चंगेडे** *(क्रमशः)*

## अध्याय २५ : यज्ञिय

'जस जसे आपण भयमुक्त होतो तसतसे
आपले अंत:र्चक्षु उद्‌घाटीत होत जातात'
संसारात चालती भाऊबंदकी, धर्मात होते भाउकी।

कर्म क्षेत्रात भाऊकी निभावणे खूप अवघड आहे. धर्म क्षेत्रात भाऊकी सहज निभावता येते. एक भाऊ दूसऱ्या भावाला नरकातून वाचवण्याचा प्रयत्न करतो. एक भाऊ दूसऱ्या भावाला संसार चक्रातून बाहेर काढण्यात सफलता मिळवतो. अशाच दोन भावांची ही महागाथा आहे.

जयघोष आणि विजयघोष. जयघोष ब्राम्हण, विजयघोष ब्राम्हण, दोन्ही युगल म्हणून जन्मले. जयघोष एकदा बनारस मध्ये गंगानदीत स्नान करण्यास गेला तिथे त्यांनी पाहिले की एक साप एक बेडकाला गिळंकृत करीत आहे आणि ज्यावेळी सापाच्या तोंडात बेडूक आहे त्याच वेळी, गिध्दपक्षी आला आणि त्या सापाला आपले भक्ष्य बनविले. साप स्वत: मृत्युच्या तोंडात आहे तरीसुद्धा तोंडातील बेडूक सोडण्यास तयार नाही.

**मी बनेन अभयंकर**

हे दृश्य जयघोषने पाहिले कशी ही संसाराची स्थिति आहे ? कसा हा संसार आहे ? कशी ही संसारात गुरफटलेली चेतना आहे की स्वत: मृत्युमुखात आहे तरी देखील दुसऱ्याला मृत्युमुक्त करीत नाही. स्वत: दु:खी आहे तरी दुसऱ्यास दु:खमुक्त करण्याची इच्छा होत नाही. का विचार करीत नाही. हा संसार मला दु:खी यासाठी करित आहे की मी त्यांना दु:खी केलं आहे. मी कोणाला मृत्युमुक्त करत नाही. म्हणून मला ही कोणी मृत्युमुक्त करीत नाही. संसाराच्या या अनादिकाळा पासून असलेली चेतना, दूसऱ्याला मारण्याची घटना बघता-बघता जयघोषाने स्वत:ला सावरले. अनादिकाळापासून माझ्या अंतरंगात सुद्धा हा प्रवाह प्रवाहित होत आहे, हा संसार चेतनेचा प्रवाह, हा कर्माचा प्रवाह, हा वासनेचा प्रवाह यातून मला पार उतरायचे आहे. मला यातून बाहेर पडायचे आहे. मला भयंकर बनून जगायचं नाही मी बनेन तर अभयंकर बनेन आणि गंगा नदी पार केली व त्याच बरोबर अंतरंगातील या प्रवाहातून सुद्धा ते पार उतरले व श्रमण-संन्यासीकडे पोहचले.

श्रमणांकडे गेला कारण त्याला ठाऊक होते की जिनशासनात केवळ जिव्हे ने सांगत नाही तर अहिंसामय जीवन जगतात. त्यांचं अस्तित्वच अभयमय असते. त्यांची नजर, त्यांची प्रत्येक क्रिया अभयदायीनी असते. ते मनानं, वचनानं किंवा काये द्वारा कुणाला ही भयभीत करीत नाही आणि अशा अभयदायी श्रमणांकडे जयघोष दीक्षित होतात.

सन्यस्त जीवन अंगीकार करून अनादिकाळाचे भीती देण्याचे संस्कार, भयभीत होण्याचे संस्कार अंतरंगातून समाप्त करून अंतरचक्षु उद्‌घाटित केले. जस-जसे आपण भय मुक्त होतो तस-तसे आपले अंतर्चक्षु उद्‌घाटित होतात. आपण जर भयभीत करीत

गेलो तर अंतर्चक्षु बंद होत जातात. म्हणूनच परमात्मा महावीरांची स्तुती करतांना सुधर्मास्वीमीनी परमात्म्याच्या अनंतचक्षु चे कारण सांगताना वर्णन केले आहे. ''अभयंकरे से वीरीए अनंत चक्खू....'' अभयंकर बनल्यानंतर अनंत अभयदानी बनतो, अनंत चक्षु उद्घाटित करतो आणि म्हणून अंतरंगातील अनंतानंत भयदेणाऱ्या मार्गांना बंद करण्यासाठी आणि अभय देण्याच्या मार्गाला उघडण्यासाठी जयघोष मुनी ज्ञान, दर्शन, चरित्र, तप आणि वीर्याच्या उत्कृष्टतम आराधनेत तल्लीन झाले. मासखमणाच्या पारण्याला मासखमण करून आपले तन पार शुष्क करून टाकले आणि आत्म्याला पुष्ट करून टाकले. शरीर अशक्त झाले व आत्मा सशक्त झाली.

**धर्मात होते भाऊकी.....**

एकदा जयघोषमुनीच्या मनात विचार आला मी तर मुक्ती पथाचा पथिक झालो पण माझा भाऊ माझ्या बरोबर जन्मलेला माझा भ्रात अजुन ही दु:खाच्या, संसारी मार्गावरच चालत आहे काय करावे ? आणि तत्क्षणी त्यांनी संकल्प केला की मी विजय घोषाला कल्याणाच्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीन, मंगलकारी-सुखकारी-दु:खहारी रस्त्यावर त्याला चालवण्याचा पराक्रम मी करणार आणि जयघोषमुनी बनारस नगरात पोहचले व पारण्यासाठी विजयघोषाच्या आंगणात गेले. विजयघोष यज्ञ करीत होता. खूप मोठा यज्ञ आयोजीला होता. खूप सारे ब्राह्मण आमंत्रित केले होते. जयघोषमुनी पोहचले त्यांचे शरीर क्षीण झालेले होते, रूप बदललेले होते.

रूपा बरोबर जुळलेली नाती रूप बदलल्यावर नाती बदलून टाकतात. चेहऱ्याच्या आधारावर स्थापीत नाती चेहरा बदलताच नाती विसरून जातात. सत्तेच्या आधारावर जुळलेले नाते सत्ता संपताच समाप्त होऊन जातात. संपत्तीच्या आधारावर जोपासलेले नाते संपत्ती खुंटताच खूडून जातात. केवळ चेतनेच्या आधारावर जुळलेली नाती बाहेरच्या परीवर्तांना नंतर ही दृढ राहतात आणि जयघोषमुनीला बघून विजयघोष अहंकाराने म्हणाला !

समुवट्ठियं तहिं संतं, जायगो पडिसेहए ।
न हु दामि ते भिक्खं, भिक्खू ! जायहि अन्नओ।।

''अहो श्रमण ! येथे बनविलेले अन्न-जेवण तुमच्यासाठी नाही, तुम्ही इथून चालते व्हा ! हे अन्न केवळ विद्वान ब्राह्मणांसाठीच आहे.'' तेव्हा जयघोष मुनी म्हणाले ''मला अन्नाची आकांक्षा आहे म्हणून मी तूला उपदेश देत आहे अस समजू नकोस परंतु तू पापकर्मातून मुक्त व्हावे म्हणून तुला सांगतो आहे ते एकदा लक्षपूर्वक ऐक.''

**जयघोषाचा उद्घोष**

नवि जाणासि वेयमुंह, नवि जन्नाणं जं मुहं ।
नक्खत्ताण मुहं जं च जं च धम्माण वा मुहं ।।

हे विप्रवर ! तुम्हाला माहिती आहे का मुख काय आहे जेथून यज्ञात प्रवेश केला जातो ? नक्षत्राचं मुख काय आहे ? वेदाच मुख अग्रिहोत्र आहे अग्रिहोत्राच मुख वेदार्थी आहे, धर्मार्थी आहे 'जन्नट्ठीवेयसामुहं' तो यज्ञार्थी आहे, जो मोक्षाची कामना करतो, जो मुक्त होण्यासाठी कर्म करतो, जो स्वत:ही मुक्त होण्याचा संकल्प करतो आणि दुसऱ्यांना मुक्त करण्यात सहकार्य करतो. नक्षत्राचं मुख चंद्रमा आहे आणि धर्मांच मुख ईश्वाकु गोत्रीय भगवान ऋषभदेव मुख आहेत. जसे चंद्राच्या अवती-भोवती बाकीचे ग्रह असतात तसेच परमात्मा भोवती सुद्धा जे मोक्ष प्राप्तिचे इच्छुक आहे ते नमस्कार करीत असतात. अहो ! विप्रवर तुम्हास ठाऊक आहे का ब्राह्मण कोणाला म्हणतात ? ब्राह्मण कोण असू शकतो ?

**ब्राह्मण गुण-लक्षण**

जो न सज्जइ आगंतु,पव्वयंतो ण सोयइ ।
रमइ अज्जवयणम्मि, तं वयं बूम माहणं ।।

जो अनासक्त असतो, कुणी आलं तर आसक्त होत नाही कुणी गेलं तरी त्रस्त होत नाही. संपत्ती

असली तरी आसक्त नाही आणि संपत्ती गेली तरी व्याकुळता नाही. जो कोणी आल्यावर चिटकून जातो आणि कुणी गेल्यावर चिडून जातो तो ब्राह्मण नसतो. रमइ अज्जवयणम्मि अर्थात् ज्याला श्रेष्ठतम भगवंतवाणीचे स्मरण होते की जो येतो तो कधी ना कधी जाण्यासाठीच. येणारा-जाणारच या सिद्धांताला जो आत्मसात करून जगतो त्याला ब्राह्मण म्हणतात.

तसपाणे वियाणेत्ता, संगहेण य थावरे ।
जो न हिंसइ तिविहेणं, तं वयं बूम माहणं ।।

१० प्राण, त्रस आणि स्थावर जीवांची मन-वचन-कायाद्वारे जो हिंसा करीत नाही त्यास ब्राह्मण जाणावे, मनांत जेव्हा क्रोध असेल, मन भीतीयुक्त असेल, मनाला लोभाने घेरलेलं असेल मनात हास्य दाबून धरलेलं असेल असा मनाच्या स्थितीत जो बोलत नाही तो ब्राह्मण असतो.

न वि मुंडिएण समणो, न ओंकारेण बंभणो ।
न मुणी रण्णवासेणं, कुसचीरेण न तावसो ।।

केवळ डोक्याचे मुंडण केलेले आहे म्हणून कुणी साधू होत नाही, केवळ ओंकाराचा नाद करतो म्हणून साधू नाही. केवळ अरण्यात राहतो म्हणून साधुत्व येत नाही, केवळ वल्कल धारण केले म्हणून साधु बनत नाही. भगवंत सांगतात.

समयाए समणो होइ, बंभचेरेण बंभणो ।
नाणेण य मुणी होइ, तवेण होइ तावसो ।।

ज्याच्या मनात समता असते, तो श्रमण असतो, जो ब्रह्मचार्यचे पालन करतो तो ब्राह्मण असतो, जो ज्ञानी आहे तो मुनी जाणावा जो तप करतो त्याला तपस्वी समजावे.

कम्मुणा बंभणो होइ. कम्मुणा होइ खत्तिओ ।
वइसो कम्मुणा होइ, सुद्दो हवइ कम्मुणा ।।

आपले कर्म, आपला जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोण चार वर्ण आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र परंतु हे जन्मत: नसतात. हे जीवनाचे दृष्टीकोण आहेत. ब्राह्मण तो जो कोणत्याही समस्येचे समाधान संवादाने करण्याचे सामर्थ्य ठेवतो. जो समस्येच्या समाधनासाठी संघर्ष करतो तो क्षत्रिय असतो. जो समस्येचे समाधान व्यापारी पद्धतीने, घेण्या-देण्याच्या पद्धतीने करतो तो वैश्य असतो, जो समस्या आल्यावर रडत बसतो, रडगाणे गातो तो शुद्र असतो, या जीवन जगण्याच्या चार पद्धती, चार प्रकार आहेत.

संघर्ष करून जगतो तो क्षत्रिय, व्यापार पद्धतीने जगतो तो वैश्य. जो रडता-रडता जगतो, आर्तध्यान-रौद्रध्यानात च जगतो तो क्षुद्र, बोध पूर्वक जगतो तो ब्राह्मण.

''हे विप्रवर ! तुम्ही कुणास ब्राह्मण समजत आहात ? कोणत्या मिथ्या क्रियाकांडात अडकले आहात. आत्मचेतनेचे जागरण झाले पाहिजे. आत्मज्योती प्रज्वलित करायची आहे. आपल्या अशुभ कर्माची आहूती द्यायला हवी, दुसऱ्या इंधनाची आहुती देऊन काय उपयोग ?''

**विजयघोष नतमस्तक**

जेव्हा हे सर्व सत्यज्ञान विजयघोषाने ऐकले त्याच्या अंत:करणात प्रकाशाचे अवतरण झाले. त्याला जाणवले आपण चूकीच्या मार्गावर चालत आहोत; आता खरा मार्ग सापडला त्याला स्वीकार केला पाहिजे.

बंधूनो ! त्याकाळचे लोकं आपली चूकी लगेच मान्य करीत असत, अगदी सहजतेने पूर्व धारणा, चूकीची पकड सोडून देत असत आणि सरळतेने सत्याशी संधान साधीत असत. तत्क्षणी विजयघोषने अगदि निष्पापमनाने सांगितले ''मुनीवर ! आमच्याकडून चूक झाली आम्हाला माफ करा आणि कृपा करून आपण अन्न ग्रहण करा. खरोखर आपण दिव्यज्ञानी आहात, सगळ्यांना पार करणारे आहात. तुम्ही स्वत:चा ही उद्धार केला व दुसऱ्यांचा उद्धार करण्यास समर्थ आहात. तुम्हाला अन्नदान केले तर मी धन्य होऊन जाईल.''

तेव्हा जयघोष मुनी म्हणाले ''मी काही अन्न

ग्रहण करण्यासाठी आलेलो नाही. मला तुमच्या अन्नाशी काही घेणं-देणं नाही, तुझ्या संपत्तीशी काही संबंध नाही, तुझ्या व्यापाराशी-घराशी. परिवाराशी काही एक घेणं-देणं नाही. मला देणं-घेणं आहे तुझ्या जीवनशैलीशी, तुझ्या ज्ञान, दर्शन आणि चरित्राशी संबंध आहे. माझा संबंध तुझ्या आत्मतत्वाशी आहे.''

''मी केवळ तुझ्यासाठी आलो आहे. माझी निर्मळ भावना आहे की तू या भयावह संसार चक्रातून बाहेर पडावे, तू या संसार चक्रात भटकू नये म्हणून माझी अगदी मनापासून कळकळ आहे म्हणून मी आलो.'' पुन्हा विजय घोषला समाजावण्यासाठी त्यांनी उदाहरण दिले.

उवलेवो होइ भोगेसु, अभोगी नोवलिप्पइ ।
भोगी भमइ संसारे, अभोगी विप्पमुच्चइ ।।
उल्लो सुक्खो य दो छूढा, गोलया मट्टियामया ।
दो वि आवडिया कुड्डे, जो उल्लो सो ऽत्थ लग्गई।।

विजयघोष ! दोन मातीचे गोळे आहेत. एक कोरडा आहे, एक ओला आहे. ओला गोळा जर भींतीवर फेकला तर तो भींतीला चिटकून जातो. सुक्का-कोरडा गोळा भिंतीवर चिटकत नाही अशाच प्रकारे जीवन जगण्याच्या सुद्धा दोन पद्धती आहे. ओले होऊन, विषयात भिजून जगा अथवा कोरडे जगा, हे माझं, ते माझं, ते माझं.... असं आसक्त होऊन जगण संसाराला चिटकून जगणं आहे, ओल्या गोळ्याचं जगणं माझं ज्ञान, दर्शन चारित्र्य हेच फक्त आहे बाकी या संसारात माझं काहीच नाही ते कोरडं होऊन जगणं, संसारात आसक्त न होता, विषयाला न चिकटता जगणं. ओले होऊन जगाल तर भोगांत गिद्ध व्हाल, कोरडे जगाल तर मुक्त पणे जगाल कसे जगायचे तुमचा प्रश्न आहे, उत्तर वाणीत जीवनाच्या समस्येचे उत्तर दिलेले आहे. ते प्राप्त करून अद्वितीय-अद्भुत जीवन हीच मंगल कामना.

*(क्रमशः)* ●

# *जीवन-बोध क्षणिकाएँ*

**श्रद्धेय श्री यशवन्तमुनिजी म.सा.**

## अन्तर नयन

बहुत किया मोह नींद में शयन
अब तो खोल अन्तर-नयन,
कर मोक्ष-मार्ग का चयन ।।

## आत्मा का स्वाद

विषय से विषाद, कषाय से अवसाद,
और दुर्गति मरने के बाद,
अब तो ले आत्मा का स्वाद,
मत कर अपने को बरबाद ।।

## शील की महिमा

शील की महिमा को
सुन, समझ और चख
स्वयं को दुखद दु:शील से
दूर ही रख ।।

## वह कैसा जैन

भोगों के पीछे दौड़ता है,
दिन-रैन, नहीं है चैन,
वह कैसा जैन ।।

## कारावास

जिसे होता है आत्मा में विश्वास,
उसी का छूटता है काया का कारावास ।।

## प्रभुवाणी

तेरी वाणी, जग कल्याणी
सुनकर प्राणी, होते ज्ञानी ।

## पहचान

खूब जानो, पर जानकारी को ही जीवन की
इतिश्री मत मानो,
स्वयं को पहचानो ।। ●

# माझ्या दृष्टिकोनातून जैन धर्म व जैन समाज

**लेखक : सुमतिलाल भंडारी, कोथरुड, पुणे**
**मो. : ९६८९९ ००२९४**

अरिहंत जागृति मंच, पुणे तर्फे भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन केले. ''माझ्या दृष्टीकोनातून जैन धर्म व जैन समाज'' या विषयावर १४६ निबंध आले. यात श्री. सुमतीलालजी भंडारी, कोथरुड, पुणे यांच्या निबंधाला पहिले पारितोषिक मिळाले आहे. हा निबंध जैन जागृतिच्या वाचकांसाठी येथे प्रसिद्ध केला आहे. – संपादक

धम्मो मंगलमुक्किट्टं अहिंसा संजमो तवो ।
देवा वि तं नमंसंति जस्स धम्मे सया मणो ।।

शय्यंभवाचार्यकृत 'दशवैकालिक' या ग्रंथाची सुरवात ही जैन धर्माबद्दल असे गौरवोद्गार काढण्याने झाली आहे. आचार्य म्हणतात की, अहिंसा, संयम, तप या लक्षणांनी असा हा धर्म मंगल आणि उत्कृष्ट आहे. या धर्माचे सदैव आचरण करणाऱ्याला देवही वंदन करतात.

असा हा आपला महान धर्म आत्मलक्षी आहे. आत्म्याला मानणारा आहे. आपल्या पुरुषार्थावर, कर्मावर भर देणारा आहे. अनादि काळापासून चालत आलेला आहे व मुख्य म्हणजे हा स्वतंत्र धर्म आहे. कोणत्याही इतर धर्माची शाखा नाही. नमोकार महामंत्रातही देवी-देवतांना वंदन करण्याऐवजी आत्म्यातील राग-लोभादि शत्रूंचा नाश करणाऱ्या अरिहंताना, मोक्षाला गेलेल्या व सिद्ध गती प्राप्त झालेल्या सिद्धांना, आचार्यांना, उपाध्यायांना आणि जगातील समस्त साधु-संतांना वंदन केले आहे. जैनांच्या अतिप्राचीन ऋषिभाषित या अर्धमागधी ग्रंथात एकूण ४५ ऋषींची माहिती दिलेली आहे. त्यात जैनांचे पार्श्वनाथ व महावीर यांचाच फक्त उल्लेख आहे. नारद, अंगिरस, पिंग आदि इतर ४३ हिंदू ऋषींची यात माहिती दिलेली आहे. असा हा आपला जैन धर्म उदारमतवादी आहे. शाकाहार ही त्याची ओळख आहे. हा धर्म सदाचरण शिकविणारा आहे. जैन तत्त्वज्ञान प्रगत आणि परिपूर्ण आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. स्वत: बरोबर इतरांचाही विचार करायला लावणारा आहे. त्यामुळे प्रत्येक जैन व्यक्तीला आपल्या धर्माचा, संस्कृतीचा अभिमानच वाटतो.

आजतागायत या धर्मात फारसे परिवर्तन झालेले दिसत नाही. त्यामुळे हा धर्म मर्यादित राहिला. अर्थात धर्म प्रसाराचे आपले उद्दिष्ट कधीच नव्हते. तरीही धर्माचा विचार करता थोडे फार बदल करणे आवश्यक वाटते आणि त्यात गैर असे काहीच नाही. कारण परिवर्तन हा प्रकृतीचा स्थायीभाव आहे. याला अनुसरुन खालील काही गोष्टी सुचवाव्याशा वाटतात.

१) गुरु महाराजांनी, आचार्यांनी तरुण शिष्यवर्ग आपल्या देखरेखीखाली तयार करावा. त्यांची तयारी करुन घेऊन त्यांना प्रवचन देण्यास उद्युक्त करावे. त्यामुळे अनेक प्रवक्ते तयार होतील. कदाचित तरुण शिष्यांना तरुण वर्गाच्या समस्या, त्यांच्या गरजा अधिक चांगल्या कळतील. पर्यायाने जैन तरुण वर्गाचा सहभाग वाढेल. ही आजच्या काळाची गरज आहे.

२)जैन श्रावकांना आगमांचे, जैन तत्त्वज्ञानाचे ज्ञान होणे आवश्यक आहे. या ज्ञानामुळे प्रत्येक जैन व्यक्तिला आपण जे काही आचरण करतो ते का करतो, त्याचा संदर्भ काय हे कळेल, त्याचा ठसा त्याच्या मनावर कायमचा राहील व आजच्या बुद्धिजीवी वर्गाचे समाधान होऊन त्यांचा सहभाग वाढेल.

३) साधु वर्गाचा भर निश्चय जयाबरोबर व्यवहार जयाकडेही असावा. तसेच धार्मिक आचरण व धर्म द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुसार परिवर्तनशील असावा. 'पण्णा समिक्खए धम्मं' अर्थात धर्माची समीक्षा प्रज्ञेने करावी यावर भर दिला जावा. यामुळे विज्ञानाधिष्ठित धर्माचे आचरण तरुण वर्गाकडून अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकेल.

४) साधु-साध्वी पायी विहार करतात. आजकाल गाड्यांच्या प्रचंड वेगामुळे अपघात होतात व तसे खूप झालेही आहेत. हा चिंतेचा विषय आहे. तसेच वृद्ध साधूंना व्हीलचेअरवर रस्त्याने न्यावे लागते. या संबंधी साधुवर्गाच्या वरिष्ठ पातळीवर चिंतन होणे आवश्यक आहे.

५) आजच्या गतिमान व धकाधकीच्या काळात तरुण वर्गाला वेळेअभावी जैन धर्माचे रुढ आचरण करणे जमत नाही. त्याऐवजी जैन आचरणाचे दैनंदिन जीवनात आधुनिक संदर्भानुसार उद्बोधन व्हावे उदाहरणार्थ रोजच्या षडावश्यक क्रिया !

**सामायिक** – दैनंदिन कामात समभावात राहणे, पूर्वग्रह दूषित न राहणे, चांगल्या वाईट गोष्टींनी उत्तेजित न होणे; **चोविसत्थव** – रोजचे काम पूर्ण श्रध्देने करणे; **वंदन** – नम्रतेने लोकांकडून कामे करुन घेणे; **प्रतिक्रमण** – आत्मनिरीक्षण, आत्मबंधन करणे, रोजच्या कामाचा आढावा घेणे; **कायोत्सर्ग** – बऱ्या-वाईट प्रतिक्रियांवर स्वत:वर नियंत्रण ठेवणे; **प्रत्याख्यान** – काहीतरी नियम घेणे मग तो व्यायामाचा असो वा तासभर टी.व्ही. मोबाईल न पाहण्याचा असो. यामुळे सर्व जैनांना रुढ आचरण रोजच्या व्यवहारातही करणे कसे शक्य आहे हे पटेल व मनोवृत्तीत चांगला बदल घडेल.

६) सध्या प्रवचनांचा भर शहरातून देण्याचा आहे. छोट्या छोट्या जवळजवळच्या चार गावात मिळून चातुर्मास व्हावेत. मग प्रत्येक गावात एक एक महिना वास्तव्य का होईना. गुरु महाराज उपलब्ध नसतील तर स्वाध्यायींची संख्या वाढविण्यावर भर द्यावा. त्या काळापुरती त्यांची व्यवस्था गावाने पहावी व प्रोत्साहना दाखल त्यांना थोडेफार मानधनही द्यावे.

७)बऱ्याचदा साध्वी वर्गाची असमान वागणूकीबद्दल नाराजी प्रकट होते. त्या संबंधानेही चिंतन व्हावे.

थोडक्यात काळानुरुप, निश्चय नयाबरोबर व्यवहार नयाची दृष्टी ठेवून काही परिवर्तन करता आले तर स्वागतार्ह ठरेल. त्याचबरोबर भविष्यकाळात धर्म वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने चांगले परिणाम होतील.

आता जैन समाजाविषयी –

सुरवातीलाच नमूद करावेसे वाटते की जैन समाजाबद्दल इतर समाजांमध्ये आदराची भावना आहे. अर्थात ती त्यांच्या वैशिष्ट्यांमुळेच. शाकाहारी, पाप-पुण्याची क्षिती बाळगणारे इतरांमध्ये ढवळाढवळ न करणारे, शांतताप्रिय, उद्योगप्रिय, सेवाभावी, दानशूर, आपल्या मृदु स्वभावामुळे इतर समाजात साखरेप्रमाणे विरघळणारे अशी कितीतरी वैशिष्ट्ये सांगता येतील. त्याचबरोबर ते पाळीत असलेली नीतिमूल्ये – पाहताक्षणी मोठ्यांना पदस्पर्श करणे, पटकन् उठून पुढे होणे व मदत करणे, एकत्र कुटुंबपद्धती, क्षमाशीलवृत्ती, धर्माप्रती अढळ श्रद्धा, कडक उपवास या गोष्टींही इतर समाजाच्या डोळ्यात भरण्यासारख्या आहे, आदर वाढविणाऱ्या आहेत. एकमात्र निश्चित की धार्मिक अभिनिवेशाखाली जैनांमध्ये हिंसक वृत्ती नाही किंवा ते इतर धर्माचा द्वेषही करीत नाहीत. उलट इतर धर्माच्या सणवारात तितक्याच उत्साहाने ते सहभागी होतात.

व्यापार करणे हा जैनाचा स्थायी भाव आहे. हा समाज संख्येने देशभरात कमी असूनही (फक्त ४४ लाख), देशाच्या एकूण प्राप्तीकराच्या जवळजवळ ७० टक्के इतका प्राप्तीकर हा समाज एकटा प्रामाणिकपणे भरतो आहे. देशाप्रतीचे हे या समाजाचे योगदान स्पृहणीय आहे व त्यामुळे मला या समाजाचा अत्यंत अभिमान आहे.

हे सर्व जरी खरे असले तरी समाजात काही अंशी परिवर्तन आवश्यक आहे. उदाहरणार्थ जैनांचे लग्न समारंभ ही एक मोठी चिंतेची बाब आहे. मोठ्या प्रमाणावर होणारे समारंभ, पैशाची वारेमाप उधळपट्टी, जेवणात पदार्थांचे असंख्य प्रकार, वाया जाणारे अन्न, चार चार

दिवस चालणारे समारंभ, सांभेळ्यामध्ये होणारे हिडीस नृत्यप्रकार, संगीत रजनीमध्ये वधूवरांचे ओढून ताणून आणलेले नृत्यप्रकार व त्याचे जाहीर प्रदर्शन (फोटो पाठविणे), व यावर कडी म्हणजे नवीन सुरु झालेले प्री-वेडिंग सेरेमनी व त्यांचेही फोटोद्वारा प्रदर्शन याने तर जैन संस्कृतीचे अध:पतन झालेले दिसते. आपण असे कृत्य करुन इतर समाजावर तर सोडा पण घरातल्या आपल्या भावी पिढीसमोर कोणता आदर्श ठेवीत आहोत याचा प्रत्येकाने गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे.

२) जैन समाज हा अधिक सुसंघटित व्हावयास हवा. सध्या या समाजाची धारणा 'आपण भले व आपले काम भले' अशी आहे. त्यामुळे समाजातील सद्‌गुणांचे रुपांतर इतर समाजाच्या नजरेत दुबळेपणात होऊन समाजाला गृहित धरलेले दिसते. थोडा फार संघटितपणा, आक्रमकपणा व अन्यायाचा प्रतिकार आवश्यक आहे. (मध्यंतरी सरकारी धोरणाविरुद्ध आवाज उठवून जैन व्यापाऱ्यांनी देशातील अर्थव्यवस्थेला हादरा दिला होता हे आठवतच असेल. त्यामुळे हे सहज शक्य आहे.)

३) आधुनिक काळात जातिव्यवस्थेला जसे दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे तसे जैन धर्मातील पंथ-उपपंथाचे व्हावे कारण भिन्न पंथ, भिन्न उपपंथ व म्हणून भिन्न विचार हे जैन धर्म व जैन समाज यांच्या दृष्टीने चांगले नाही. प्रत्येकाची 'जैन' हीच ओळख व्हावी. त्याचबरोबर सर्वांनी एकत्र येऊन सर्व कार्यक्रम, सणवार एकत्रितरित्या साजरे करणे ही काळाची गरज आहे.

४) भारतीय जैन संघटना सर्वच थरांवर सेवाभावी काम करीत आहे व या त्यांच्या कामाची राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर नोंद घेतली गेली आहे. अशा संघटना निर्माण व्हाव्यात.

५)जैन समाजाने धार्मिक चौकटीत राहून पण थोडा फार लवचिकपणा दाखवून आपल्या कुटुंबात आनंदी समाधानी वातावरण कसे राहील, कुटुंबातील परस्परांविषयी आदराची भावना कशी वाढीला लागेल हे कुटुंबप्रमुखाने पाहणे गरजेच आहे.

६)सद्य:स्थितीत श्रावकांचे आपल्या धंद्यावर, मोबाईलवर सारखे लक्ष असते. त्यात वावगे काहीच नाही, पण प्रवचनातही मोबाईलकडे सतत लक्ष व बोलणे चालू असते हे खटकते. त्या दृष्टीने उद्‌बोधन व्हावे. तासभर मोबाईल न पाहण्याने अथवा आपल्या मुलावर जबाबदारी सोपविण्याने फारसे नुकसान होत नाही.

७)जैन धर्मात दानाला अतिशय महत्त्व असल्याने समाजातील प्रत्येक जण आपापल्या परीने धर्मस्थानात दान देत असतो. मग ते पेटीत टाकलेल्या पैशाच्या रुपाने असो वा चढावाच्या रुपाने असो वा अभिमंत्रित केलेले कलश घेऊन असो वा पाळणा-घरात आणून असो. असे जे पैसे गोळा होतात, त्याचा मंदिराच्या कामी उपयोग करुन उरलेले गावाच्या सुधारणेकरिता खर्च केल्यास जैन समाजाचे ते कार्य इतरांमध्ये उठून दिसेल व इतरांना प्रेरणादायी ठरेल. याचाही समाजाने विचार करावा.

८) जैन समाजात संथारा व्रताचे पावित्र्य व महत्व खूप आहे. मात्र हे व्रत आयुष्याच्या अगदी शेवटी (अंतिम क्षणी) घेतले जाते. आगमात नमूद केल्याप्रमाणे या व्रताचा काळ १२ वर्षाचा आहे. छोट्या छोट्या गोष्टीतून (उदा. उनोदरी सारख्या तपाने) याची सुरवात करता येईल. त्यामुळे घरातले लक्ष कमी होईल, अपरिग्रहाची व इतरांवर जबाबदारी सोपविण्याची सुरवात होईल आणि आध्यात्मिक बैठक तयार व्हायला पुरेसा वेळ मिळेल. त्याचबरोबर आयुष्याचा उत्तरार्ध शांततेत व आत्मिक सुखात व्यतीत करता येईल. या दृष्टीने उद्‌बोधन व्हावे.

परिवर्तन ही आजच्या काळाची गरज आहे, परंतु हे सोपे नाही. त्याकरिता साधुवर्गाच्या वरिष्ठ पातळीवर तसेच समाजातील धुरीणांच्या पातळीवर उद्‌बोधन तसेच गंभीरतापूर्वक विचारमंथन व्हावयास हवे, तरच हे शक्य होईल. ●

## कव्हर तपशील - मे २०१८

❖ **गुरु आनंद तीर्थ, चिचोंडी**

राष्ट्र संत आचार्य आनंदऋषिजी महाराज यांची जन्मभूमी असलेल्या चिचोंडी शिराळ, ता. पाथर्डी येथे गुरु आनंद तीर्थ येथे अक्षय तृतीयेला दि. १८ एप्रिल रोजी भव्य वर्षीतप पारणा महोत्सव संपन्न झाला. महासतीजी पुज्य श्री विश्वदर्शनाजी, पुज्य प्रितीदर्शनाजी, पूज्य सुनंदाजी आदि ठाणा यांच्या सान्निध्यात सुमारे १०३ तपस्वींचे पारणे संपन्न झाले.

❖ **दीक्षा महोत्सव, पुणे**

श्री वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघा मध्ये मुमुक्षु टिना मकाना व हर्षा मकाना या दोन बहिणीचे दीक्षा महोत्सव २० एप्रिल २०१८ रोजी नाजुश्री मंगल कार्यालय येथे भव्य कार्यक्रमात संपन्न झाली.

या कार्यक्रमासाठी प.पू.श्री विवेकमुनीजी म.सा, प.पू.श्री गौरवमुनीजी म.सा., प.पू.श्री मंजुश्रीजी म.सा., प.पू.श्री प्रियदर्शनाजी म.सा., प.पू. श्री चंदनाजी म.सा., प.पू. श्री प्रतिभाजी म.सा., प.पू. श्री प्रफुल्लाजी म.सा., आदी साधु साध्वींचे सान्निध्य लाभले.

❖ **सौ. अलकाबेन गुजर, पुणे – दीक्षा**

ऋतुराज सोसायटी, पुणे येथील वैरागीबेन सौ. अलकाबेन उदयभाई गुजर यांची दीक्षा २५ एप्रिल रोजी शत्रुंजय मंदिर, पुणे येथे भव्य महोत्सवात संपन्न झाली. दीक्षेनंतर सौ. अलकाबेन यांचे नाव साध्वीश्री कल्याणनिधीजी म.सा. असे ठेवण्यात आले.

❖ **जैन कॉन्फ्रेंस युवा शाखा, पुणे**

जैन कॉन्फ्रेंस युवा शाखा तर्फे पुज्य साधु–साध्वी यांचे सांसरिक आई–वडील, भाऊ–भाभी इ. परिवाराचा सन्मान समारोह आदिनाथ स्थानक, पुणे येथे आयोजित केला. यावेळी सुमारे ४० साधु–साध्वी उपस्थित होते. यावेळी सुमारे १६३ लोकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. राष्ट्रीय मुख्य युवा संरक्षक श्री. पारसजी मोदी व राष्ट्रीय युवा अध्यक्ष श्री. शशिकुमारजी कर्नावट पिन्टु यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे सुंदर आयोजन झाले. या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते.

❖ **श्री. अविनाशजी चोरडिया, सन्मान**

जैन कॉन्फ्रेंस दिल्ली येथे राष्ट्रीय कार्यकारणीची सभा १ एप्रिल रोजी संपन्न झाली. यावेळी जैन कॉन्फ्रेन्सचे प्रमुख मार्गदर्शक श्री. अविनाशजी चोरडिया यांना 'संघ लक्ष्य शिरोमणी' पदवी देवून कॉन्फ्रेन्स तर्फे सन्मान करण्यात आला.

❖ **जीतो, पुणे – पुरस्कार समारोह**

जीतो पुणे च्या वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी जीतोच्या वतीने दिला जाणारा विविध पुरस्कार आमदार माधुरीताई मिसाळ यांच्या हस्ते देण्यात आला. श्री. चंदुभाई शहा यांना यावेळी जीवन गौरव पुरस्कार तसेच शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल ॲड. एस.के.जैन, सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सौ प्रमिला साकला, उद्योग क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल इंदर जैन व युवा उद्योजक म्हणुन विशाल चोरडिया यांना विशेष पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रसंत श्री ललीतप्रभाजी म.सा., जीतोचे अध्यक्ष विजय भंडारी, मुख्य सचिव नरेंद्र छाजेड, सचिव अजित सेटिया, खजिनदार कांतीलाल ओसवाल, सल्लागार मंडळाचे विजयकांत कोठारी, देविचंद जैन, अचल जैन, राजेश साकला आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी 'जीतो नगर' या गृहप्रकल्पाची घोषणा करण्यात आली.

## ❖ अरिहंत जागृती मंच, पुणे

अरिहंत जागृती मंच तर्फे भगवान महावीर जन्म कल्याणक निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'माझ्या दृष्टिकोनातून जैन धर्म आणि जैन समाज' याविषयावर ही खुली निबंध स्पर्धा होती. पारितोषिक वितरण कार्यक्रम बिबवेवाडी जैन स्थानक येथे झाला. प्रथम पारितोषिक विजेते श्री. सुमतीलालजी भंडारी यांचा सन्मान करताना डॉ.सौ. विमल बाफना, श्री. पोपटशेठ ओस्तवाल, श्री. चांदकुवर नवलखा व सोबत अरिहंत जागृती मंचचे श्री. राजेंद्र सुराणा, श्री. श्रीपालजी ललवाणी, श्री. संजय चोरडिया, श्री. विजयजी पारख, श्री. शांतीलालजी जैन इ.

## ❖ अरिहंत सोशल ग्रुप, पुणे

आचार्य सम्राट आनंदऋषिजी म.सा. यांच्या स्मृतीदिनानिमित्त व महावीर जयंतीचे औचित्त साधत अरिहंत सोशलग्रुपच्या वतीने बिबवेवाडी भागातील आधार-मूक बधीर विद्यालयाला आवश्यक असणाऱ्या विविध वस्तूचे वाटप करण्यात आले.

यावेळी ग्रुपचे अध्यक्ष अभय संचेती, प्रकाश दर्डा, हरकचंद मनसुखलाल डुंगरवाल, संपत बोथरा संपत गांधी, सुनील गुंदेचा, सुखलाल शिंगवी, धनराज कटारिया यांच्यासह ग्रुपचे अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ❖ मे. राका गॅस सर्व्हिस, चिंचवड

चिंचवड येथील गत ५५ वर्षापासून अविरत सेवा देत असलेल्या मे. राका गॅस सर्व्हिस द्वारा ''उज्ज्वल दिवस'' कार्यक्रमाचे आयोजन चिंचवड येथे करण्यात आले. प्रतिनिधीक स्वरूपात ११० मागासवर्गीय यांना गॅस कनेक्शनचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी भोसरी येथील आमदार श्री. महेश दादा लांडगे, पि.चि.म.न.पा. च्या उपमहापौर श्रीमती शैलेजा मोरे, नगरसेविका श्रीमती अनुराधा गोरखे, उद्योजक श्री. सुभाष जैन, श्री.मनोहर दिक्षीत, प्रकाश जैन, शामसुंदर बोरा, भरत सोळंकी, राका गॅस सर्व्हिसचे संचालक श्री. जयप्रकाश राका, राजेन्द्र राका, किरण राका आदि मान्यवर उपस्थित होते.

## ❖ जैन सोशल ग्रुप, पुणे परिवार

जैन सोशल ग्रुप पुणे परिवार वर श्री. दिलीप चोरबेले यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांचा शपथविधी राष्ट्रीय अध्यक्ष शरदभाई शहा यांच्या हस्ते झाला. त्याप्रसंगी नगरसेवक प्रवीण चोरबेले, राष्ट्रीय उपाध्यक्ष सतिषजी बाफना, सेक्रेटरी बिरेनभाई शहा, लालचंदजी जैन, प्रवीण चोपडा, मांगीलाल कोठारी, राजेश दोशी उपस्थित होते.

## ❖ श्री. नंदकुमारजी चोरडिया, चाकण

चाकण पुणे येथील उद्योगपती श्री नंदकुमारजी शांतीलालजी चोरडिया यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तर्फे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

१५ एप्रिल रोजी पुणे येथे माजी केंद्रीय मंत्री श्री. सुशिलकुमारजी शिंदे व महाराष्ट्र राज्य मंत्री श्री. गिरीषजी बापट यांचा हस्ते पुरस्कार देण्यात आला.

## ❖ रांका ज्वेलर्स, पुणे

रांका ज्वेलर्स तर्फे सातारा रोड, पुणे येथे भेट वस्तुंसाठी भारतात सुप्रसिद्ध ठरलेल्या मोमेंट्झ या सुप्रसिद्ध इटालियन ब्रँडच्या महाराष्ट्रातील पहिल्या भव्य शोरुमचा पुण्यात अक्षय्य तृतियेच्या मुहूर्तावर शुभारंभ करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून श्री. ओमप्रकाशजी रांका, श्री. वास्तुपालजी रांका व रांका परिवाराला शुभेच्छा दिल्या.